# 'मोठा माणूस' म्हणावे तरी कोणाला?

## *प्रसंग - जळगाव 'तरुण भारत' दैनिकाचा 'उद्योग' विशेषांक प्रकाशन सोहळयानिमित्त*

*दि. १८-०६-२००८, स्थळ - बडी हांडा हॉल, जैन हिल्स,जळगाव*

*आजच्या जागतिकीकरणाच्या, उदारीकरणाच्या प्रचंड झंझावातात 'कुटुंबसंस्था' तीव्रतेने जपण्याची गरज भाऊ स्पष्ट करतात. 'तरुण भारत' दैनिकांच्या 'उद्योग' विशेषांक प्रकाशन सोहळ्यात भाऊ पैशाकडे कोणत्या दृष्टीने पहावे, ती दृष्टीही देतात. पैसा साध्य नव्हे तर साधन कसे? हे समजून घेण्यासाठी मूळ भाषणच वाचावे, गांधीजींचे उदाहरण तर डोळ्यात अंजन घालणारे. टाटा कंपनीची सामाजिक बांधिलकी समजल्यानंतर आपणही नव्या नजरेने उद्योग जगताकडे पहायला लागतो. सद्सद्विवेकबुद्धी, संयम, शांतवृत्ती, सकारात्मकता, विनम्रता आयुष्यात किती आवश्यक आहे हे भाऊ सोदाहरण लक्षात आणून देतात. प्रत्येक माणसातल्या ईश्वराला साद घालता आली पाहिजे, ही सद्भावनाही व्यक्त करतात.*

सन्माननीय व्यासपीठ,

डॉ. अविनाश आचार्य तथा दादा, जोशी साहेब तसेच उपस्थित बंधू-भगिनींनो,

उद्योगाच्या दृष्टीने हा काळ अत्यंत निर्णायक असा आहे, अस्थिर असाही आहे. सर्वच उद्योगसंस्था अस्थिर आहेत असेही नाही, परंतु अनेक व्यावसायिक संस्था, शेती आणि एकूण समाजजीवनच अस्थिर झालेले आहे. एका विशिष्ठ वर्गाला खूप पैसा मिळतो आहे. बाकीचे वर्ग त्या मानाने मात्र, उपेक्षेचा अनुभव घेत आहेत. वैभवसंपत्ती असणाऱ्यांचा वर्ग आणि दारिद्र्यात खितपत पडणाऱ्यांचा वर्ग अशा दोन स्तरामधले अंतर आणि खोली दिवसेंदिवस वाढतच जात आहे. समाजाच्या दृष्टीने ही फार चांगली गोष्ट आहे, असे नाही! ती अशांतीची नांदी ठरु शकते, ठरेल! जे आठ हजार वर्षात घडले नाही, ते इथे आता घडणार नाही, असे म्हणण्याचे धारिष्ट्य दुर्दम्य आशावादी असणारे विचारवंतही करीत नाहीत, त्यामुळे आपणा सर्वांच्या समोर हा एक प्रश्न आ-वासून उभा आहे.

औद्योगिकीकरणाचा, उदारीकरणाचा आणि जागतिकीकरणाचा फायदा ज्यांना होत आहे, त्यांना तर एकूणच परिस्थिती त्यांच्या दृष्टीने सुखासीन आहे, असे वाटते. सुखवैभवाचा आस्वाद घेताना आपल्या भोवतालच्या सामाजिक परिस्थितीकडे थोडीशी खिडकी उघडून,निदान फटीतून... झरोक्यातून तरी हालअपेष्टा भोगणाऱ्यांकडे ही माणसे पाहतात का? उपेक्षितांचा कणभर तरी विचार करतात का? का, उंची गाद्या गिरद्यांमुळे या सुखासीन

निब्बवर मनाला, अशा विचारांचा स्पर्शही होत नाही? 'व्यवहारा' चे चष्मे माणसाला इतके संवेदनाहीन करु शकतात का? असे अनेक प्रश्न मित्रांनो, आपल्यासमोर आहेत, अशा **समस्यांची उत्तरे नेमकी काय असू शकतील, हे प्रत्येकाने आत्मपरीक्षण करुन शोधून काढायची आहेत. उत्तरे निश्चितच सापडतील, अशा वेळी केवळ उत्तरे सापडून चालणार नाही, परिणामकारक बदल घडवून आणण्यासाठी आपण योग्य कृती करायला सिद्ध होणार असू, तरच ते भविष्याच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह ठरणार आहे!**

'आजची समाजरचना:तिचे स्वरुप आणि पूर्नबांधणी' असे शीर्षक असलेले माझे पुस्तक, ग्रंथालीने २००१ मध्ये प्रकाशित केले. साधारणतः १०० पानांचे हे पुस्तक आहे. या पुस्तकात मी जे मांडले आहे ते साधारणतः आत्ता मांडलेल्या मुद्यांशी संबंधित आहे. एका तीरावर अत्यंत उन्मत्त असे धनाढ्य आणि दुसऱ्या तीरावर शक्तिमान पुढारी वर्ग आणि नोकरदार, यांच्या अभद्र युतीमुळे समाज भरडला जातो आहे. या पुस्तकात काही मूलभूत हक्कांची मागणी मी केली होती. जसे लोकप्रतिनिधिंना परत बोलावण्याचा अधिकार मागितला होता. वास्तविक पहाता, तसा कायदाही आहेच! कायद्याची अंमलबजावणी निर्णायक ठरणार आहे. छत्तीसगडसारख्या राज्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये हे घडून आले, मित्रांनो ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे.

'लोकशाही' एक उत्तम शासनपद्धती, किती ही विद्रूप स्वरुपात का असेना, पण अजून तरी आपल्या देशात जिवंत आहे, याचे जिते जागते उदाहरण म्हणजे छात्तिसगड मधील ही घटना! हा अधिकार मागण्यापेक्षा, आपण तो हक्काने प्राप्त केला आहे. या हक्काच्या अंमलबजावणीची सुरुवात ग्रामपंचायतीपासून झाली आहे, त्यामुळे नजिकच्या काळात एम.एल.ए घरी आले, तरी ते वावगे झाले, तरी काही वेगळे घडले असे होणार नाही. अन्यायाविरुद्ध लढण्याची जी सामाजिक शक्ती, या माध्यमातून उभी राहते आहे , ते अधिक महत्त्वाचे आहे. 'द प्राईस ऑफ लिबर्टी इज व्हिजीलन्स' असे म्हणतात. समाज जागरुक नसला, तर लोकशाही हे वरदान ठरण्यापेक्षा शाप ठरेल, मात्र जनता जागरुक असली तर राज्यकर्त्यांनाही जागरुक रहावेच लागेल. वर्तमानात तसे घडते आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

मित्रहो, एक बाब नक्कीच आहे की, समाजामध्ये आजही मोठ्या प्रमाणावर अशांती, असूया, भेदाभेद निर्माण होतो आहे. परस्परांबद्दलचा विश्वास, आदर, सहकार्याची सद्भावना, प्रेमभाव हे सर्व, त्यामुळे कमी कमी होत जाते. निकोप समाज विकासासाठी, कोणत्याही अंगाने विचार केल्यास अशी परिस्थिती पोषक नाही. अशा घातक आणि कटू परिस्थितीचा

आपण फारच गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. उदारीकरणामुळे कुटुंबसंस्कृती संदर्भात काही चिंताजनक बाबी समोर येत आहेत. ज्या कुटुंबसंस्थेवर हा समाज उभा आहे. त्या संस्थेचेच विच्छेदन होत आहे. एकत्र कुटुंबपद्धतीत पूर्वी एकमेकांविषयी प्रेमभाव वसत असे आता माता पित्या बद्दल, आजोबा-आजीबद्दल आदर न बाळगणारे तरुण आपल्या समोर आहेत. अर्थात हे तरुण असे का वागतात? हा भागही वेगळाच आहे. परंतु हे घडते आहे, हे आपसातील दुराव्याचे भीषण, वास्तव-चित्र आहे.

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीत, व्यवसायाच्या संदर्भातही एकमेकांना सहजतेने मदत होत असे आई-वडीत,काका, बंधू या सर्वांच्या सहकार्यातून अनेक व्यवसाय सांभाळले जात, वाढवले जात. मित्रांनो, माझ्या उद्योग-व्यवसायांच्या वृद्धिचा विचार केल्यास, मी कृतज्ञतेने हे सांगू इच्छितो की, मला कुटुंबातील या सर्वांची खूप मदत झाली आहे. हा विकास एकात्मिकतेचे दर्शन आहे, कुटुंब आणि उद्योग व्यवसायाची भरभराट या विषयी गांभिर्याने विचार करताना आपल्याला एकमेकातील सहकार्याचा आधार कसा प्राप्त होतो, याचा आधी विचार करावाच लागेल. कौटुंबिक सौख्य, समाधानावर तसेच सहजशीलता-सौजन्यशीलतेवर अनेक गोष्टी अवलंबून असतात. हे प्रत्येकाने लक्षात घेण्याची नितान्त गरज आहे. हे सर्वच विषय खूप गहन, सखोल आणि व्यापक आहेत. यावर सविस्तर चर्चा करण्याची ही जागा नाही. असो.

मित्रांनो, आपण काही प्रश्न विचारले, तर त्या अनुषंगाने हा संवाद आपल्याला पुढे सुरु ठेवता येईल. आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख मी इथे करणार आहे. आता माझ्या जवळ खूप कमी वेळ आहे, 'रात्र थोडी सोंगे फार' अशी परिस्थिती आहे. सामाजिक कामेही खूप करायची आहेत. येणाऱ्या पाचवर्षात अशा भरीव सामाजिक सत्कार्यासाठी १०० कोटी रुपये, खर्च वजा गुंतवणूक करायची आहे. एवढे पैसे कमवायला माझ्याकडे आठहजार सहकारी आहेत, पैसे लावायला मात्र मी एकटा आहे. अनेक कामांचा आराखडा तयार आहे. ईश्वरकृपेने निश्चितच ही चांगली कामे पूर्ण होणार आहेत. तेवीस पुस्तके प्रकाशित करावयाची आहेत, त्यापैकी सात पुस्तकांचे काम जवळ जवळ होत आले आहे, त्यापैकी तीन-चार प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. इतर पुस्तके बाकी आहेत. असे व्यस्त वेळापत्रक असल्यामुळे आपण मला केवळ 'दागिना' या दृष्टीने वापरु नका. या उलट योग्य अशा सामाजिक कार्यासाठी माझा अवश्य उपयोग करून घ्या.

**प्रश्नोत्तर माध्यमातून सुसंवाद-**

प्रश्नः- (जोशीसाहेब) समाजामध्ये पेशाचे अवास्तव महत्त्व वाढते आहे असे आपल्याला

वाटते काय? आणि वाटत असेल तर हे महत्त्व कमी करण्यासाठी आपल्याला काय करता येईल?

भाऊः- ‘वाटते काय?’ हा प्रश्नच असू शकत नाही. पैशाशिवाय कशालाच महत्त्व नाही, ही वस्तुस्थिती आहे! पैशाचे महत्त्व केवळ वाढतेच आहे असे नाही तर इतर कोणत्याही गोष्टीचे महत्त्व शिल्लक आहे का याचा शोध घेण्याची वेळ आली आहे. समाजाची मानसिकता कशी आहे, पहा, आर्थिक मापदंडावरच सगळ्या गोष्टी मोजल्या जात आहेत. एकदा एका राजकारणी मित्राने गंमतीने सांगितले की, “जो स्वतःचे भले करु शकत नाही, तो दुसऱ्यांचे काय भले करेल? लोकांची अशा पद्धतीने विचार करण्याची मानसिकता असल्यामुळे आम्ही राजकारणी मंडळी, आधी स्वतःच्या भल्याचा विचार करतो, नंतर दुसऱ्यांच्या फायद्याचा विचार करतो.” (हंशा) ह्या राजकारणी मित्राने पुढे पुष्टी जोडली, “राजकारणामुळे आम्हाला मोठमोठी पदे मिळतात, त्यामुळे पैसे कमवण्याची आयती संधीच चालून येते, अशी सुवर्णसंधी लाभूनही आम्ही त्यासंधीचे सोने केले नाही; तर हे लोक पैसे कमवायला लायक आहेत असे लोकांना समजणार तरी कसे?” (हंशा) पहा, मित्रांनो, राजनीतीमध्ये असे विचार सर्रास बळावले आहेत.

बाकीची सर्व क्षेत्रे सुटली आहेत, असेही राहिलेले नाही. खिशात पैसा नसेल तर काय हाईल? कानाशी मोबाईल नसला तर काय होईल? असे विचार अनेकांना सतत भेडसावत असतात. आता मला एक सांगा, पंधरा-वीस वर्षापूर्वी मोबाईल होते का? नव्हते, व्यवहार होत नव्हते का? मोबाईल नसल्यामुळे काही चमत्कार घडत होते का? माणसे त्यामुळे झाडाला लटकत नव्हती आणि चालताना डुलक्याही मारत नव्हती.(हंशा) मोबाईल वाचून काय अडते? काहीही अडत नाही! पूर्वीही त्यावाचून जीवनव्यवहार सुरु होतो, आजही सुरु राहू शकतो. काही लोकांना जळी, स्थळी मोबाईल लागत असतो. त्याशिवाय त्यांच्या मनाला स्वास्थ्यच लाभत नाही!

आता प्रश्न असा आहे की, पैशावरचे प्रेम कमी कसे करायचे? तसे करण्याची गरज आहे का? हल्ली मुलांचे शाळेत नाव शाळेत टाकायचे असेल तर दहा-वीस हजार रुपयांचे अनुदान द्यावे लागते. साहजिकच मनात प्रश्न निर्माण होतो. पैशाशिवाय अशा परिस्थितीतून मार्ग तरी कसा काढायचा? आपल्या मुलाला /मुलीला ‘ शिक्षणच ’ जर मिळणार नाही तर पुढे काय होईल? अशा वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालेल का? म्हणूनच मित्रांनो, हे स्पष्ट आहे की, पैशाचे महत्त्व अतिरिक्तच वाएायला लागले वर्तमानानुतर फार जास्त महत्व पैशाला प्राप्त झाले आहे. सर्वांच्या हातात पैसा यायला लागला आहे, ज्याच्या हातात

जास्त पैसा तयाला समाजात प्रतिष्ठा अधिक, असेही चित्र निर्माण झाले. आपण आधी सरस्वतीपूजक होतो नंतर लक्ष्मीपूजक झालो! शारदेचे स्थानमहात्म्य कमी कमी होत गेले, तिची जागा, तिची प्रतिष्ठा लक्ष्मीला दिली गेली.

मित्रांनो, आता दुसऱ्याही बाजूने विचार करु पैसा कमावणे हा पुरुषार्थ आहे, असा विचार अगदी पुराणापासून आहे. आपल्या वाङमयात लक्ष्मीला कधीही कमी लेखलेले नाही. पैसा कमावणे पाप आहे, असे जर कुणी म्हणत असेल तर ते साफ चूक आहे, परंतु पैशाच्या मागे धावून, सामाजिक बांधिलकी सोडणे, कुटुंबालाही दूर लोटणे, वाट्टेल तो मार्ग अनुसरुन पैशाच्या मागे लागणे, हे सर्वथा अयोग्य आहे. चुकीच्या मार्गाने घरात आलेला पैसा नक्कीच मन:शांती बिघडवतो. अनिष्टमार्गाने प्राप्त झालेला पैसा, येतो तसाच जातो. माझ्या आयुष्याच्या वाटचालीत अशी अनेक उदाहरणे मी स्वत:पाहिलेली आहेत. पैसा ही पिढ्यान पिढ्या, अक्षय टिकणारी बाब नव्हे! पिढ्यान पिढ्या टिकते, सदाचारी प्रतिमा!(टाळ्या) हे सर्व माहीत असूनही पैशाच्या प्रेमात माणसे का पडतात? हा प्रश्न निर्माण होतो. असा प्रश्न मित्रांनो, मी स्वत:लाही विचारला आहे. मला उत्तर मिळाले ते असे की, समाजाने संपत्तीला प्रतिष्ठा दिल्यामुळे तसेच कुटुंबाची ती अपरिहार्य गरज झाल्यामुळे आपलीही मानसिकता तशी झाली आहे. यावर उपाययोजना काहीच नाही का? याचाही साक्षेपाने विचार करु.

मित्रांनो, आपण आपल्या गरजा हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न केला, तर पैशावरचे प्रेम आपण कमी करु शकू हाच त्या समस्येवरील प्रभावी उपाय आहे. गरजा कमी करायच्या, म्हणजे नेमके काय करायचे? ज्या गरजा आवश्यकता नसतांनाही, अनाठायी आपण वाढवल्या आहेत, आणि वाढवत आहेत, आधी, स्वत:वर कठोर बंधन घातले पाहिजे. पैशासाठी अनाठायी धावण्याची गरज वाटणार नाही. त्याबाबत धावायचेच असेल तर एखादे भव्य उदिष्ट डोळ्यासमोर ठेवा, त्यासाठी धावा! असे धावणे, परिश्रम घेणे, टप्प्या टप्प्याने यशस्वी होत जाणे आयुष्यासाठी अधिक गुणवत्तावर्धक ठरते.

उच्च ध्येय आकांक्षेच्यामागे आपण धावत गेलो, तर आपल्या आंतरिक गुणांचा योग्य दिशेने विकासही होतो. या सर्वांगीण, एकात्मिक व्यक्तिमत्त्व विकसनाचे मूल्य अनमोल असते. सात्त्विक समाधान आणि खऱ्या सुखाची प्रचीती हे नित्यानुभव बनतो, असे अनुभव पैशाच्या मापदंडाने मोजता येत नाहीत! पैशालाच साध्य समजून जर आपण आयुष्य रखडणार असाल, तर नेहमीच असमाधानी राहणार आहोत, कारण पैसा हा सतत अपूर्णच पडणार. चारशे रुपयातही घरखर्च भागवणारे आहेत. दुसरी एखादी व्यक्ती चार हजार कोटी रुपयाच्या

घरात राहते. खरोखरच अशा महाबंगल्यात राहण्याची गरज आहे का? अशा विशालप्राय घराशिवाय, असा माणूस व्यवसाय करु शकणार नाही का? इतर कुणाचाही माझ्या एवढा मोठा आणि महागडा बंगला नाही, असा बंगला फक्त माझ्याजवळ आहे, हे दाखविण्याची जी अभिलाषा आहे, त्यापोटी, ती व्यक्ती असे प्रदर्शनीय आयुष्य जगत असते.

प्रदर्शनीय, बेगडी लोकांचे अनुकरण आपण करणार असू तर ती आपली घातक चूक आहे. **अनुकरण प्रिय व्हायचेच असेल तर, सद्‍गुणांचे अनुकरण करावे!** पण, असे अनुकरण करणे कठीण आहे. मित्रांनो, मला सांगा एखादा चार हजार कोटी रुपये खर्च करून एखादा धनाढ्य घर बांधणार असेल तर ते भारतीय अर्थव्यवस्थेची एकूण परिस्थिती पहाता नैतिकदृष्ट्या योग्य आहे का? तेव्हढ्या पैशात आज संबंध महाराष्ट्रातील, उर्वरित ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. कमीत कमी चार, कोटी लोक आजही चांगल्या पाण्यापासून वंचित आहेत. आपण जर असे उद्दिष्ट बाळगले की, मला घरोघरी २० पैसे लिटर प्रमाणे बिसलरी सारखी व्यवस्था करता येईल का? अशा समाजहितैषी कार्यासाठी मी आयुष्य वेचायचे ठरविले तर ते काम अधिक महत्त्वपूर्ण ठरणार नाही का?

समजा चार हजार कोटी रुपये माझ्याकडे असले आणि मी ते अशा भरीव कामांसाठी लावायचे ठरवले, तर ती बाब अधिक योग्य होणार नाही का? त्या ऐवजी चार हजार कोटीचा बंगला बांधला आणि त्यात राहायचे ठरविले तर त्या महागड्या बंगल्याचा परिणाम म्हणून माझ्या पुढची पिढी खूपच हुशार निघेल, असे आपल्याला वाटते का? अनावश्यक गरजा वाढल्याने,पैशासाठी नको ती धावाधाव करावी लागते. मित्रहो, पैशाला साध्यान समजता, साधन म्हणून समजणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे तथाकथित विद्वत्तेमुळे माणूस, खऱ्या अर्थाने मोठा होत नाही त्याप्रमाणे पैशाच्या बळावरही तो मोठा होत नसतो. राजकीय पदांमुळेही माणूस खऱ्या अर्थाने मोठा आहे, असे कदापिही म्हणता येणार नाही. मोठा माणूस म्हणावे तरी कोणाला? **संवेदनशीलपणे इतरांच्या प्रती विचार केल्यामुळे माणूस मोठा होतो. इतरांच्या जीवनात अधिकाधिक आनंद आणण्याचा प्रयत्न जर तो करणार असेल, तरच तो मोठा माणूस!**

महात्मा गोंधीजींनी केवळ स्वतःच्या किंवा आपल्या कुटुंबीयांच्याच सुखाचा विचार केला नाही. ते ज्या जाती-जमातीत जन्माला आले, त्यासाठीच कार्य करण्याचा विचार त्यांनी केला नाही. त्यामुळेच आयुष्यालाही पुरुन उरेल एव्हढे प्रचंड काम त्यांनी करून दाखवले गांधीजींना अनेक प्रयोग करावे लागले, नित्यनवे मार्ग योजावे लागले, हे सर्व करताना त्यांना कशाची कमतरता जाणवली, असेही झाले नाही, कारण त्यांनी अतिरिक्त

गरजा वाढवल्या नाहीतउ अंगावर दोन साधी वस्त्रे नेसली, थोडेसे शेळीचे दूध आणि खजूर एवढे खाल्ले मित्रांनो, आपल्या त्यागशील जीवनामुळे ते ‘महात्मा’ झाले! आपण स्वतःच्या पलीकडे इतरांचा विचार करतो का? आपली संपत्ती, आपले बंगले ह्याचाच विचार होताना दिसतो.

वास्तविक संपत्ती तर इथेच सोडून जाणार आहोत. कोणत्याही व्यक्तीच्या कर्तृत्वाचे, आदर्श प्रतिमेचे मूल्यमापन केवळ संपत्तीच्या निकषावर होत नाही, आणि तसे ते केले जात असेल, तर ती मूल्यमापनाची पद्धतच गैर आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. मित्रांनो, म्हणूनच अनेक कार्यक्रमात मी स्वतःहून विनंती करीत असतो की, माझा परिचय देऊ नका. कारण लोक परिचय करुन देताना एक विशिष्ट दृष्टिकोनच बाळगताना दिसतात. पाईपचा कारखाना, ड्रीप इरिगेशनचे काम, आर्थिक भरभराट हेच सांगत राहतात. भाऊंचे विचार ऐकले, वाचले त्यातून ही प्रेरणा घेतली. आमच्या सामाजिक, वैयक्तिक आयुष्यात त्यामुळे असा असा बदल झाला. आम्हाला आयुष्य सकारात्मक पद्धतीने आनंददायी जगता आले हे फार अपवादात्मकच नोंदवले जाते. चारशे ते पाचशे लोकांनी मात्र असा अभिप्राय प्रामाणिकपणे लिहून पाठवला आहे. केवळ उद्योग-प्रकल्पांचा, आर्थिक समृद्धीची ओळख करुन देण्याचा प्रकार, भयंकरच म्हटला पाहिजे! मित्रांनो, कोणत्याही व्यक्तीचा परिचय करुन देण्याची जबाबदारी असणाऱ्या परिचय कर्त्यांने अभ्यासकरुनच बोलले पाहिजे. ज्यांना वैचारिक दृष्ट्या माझा परिचय नाही, अशाच व्यक्ती अनेकदा ओळख करून द्यायला उभे राहतात, असा अनुभव आहे.

‘बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले’ संतांचे हे वचन प्रसिद्ध आहे. भाषणात मी ज्या मूल्यांचे विवेचन करतो आहे, ती मूल्ये आचरणातही आणली आहेत. मी स्वतःहून अनेक गरजा कमी केल्या आहेत. आर्थिक समृद्धी असतानाही गरजा कमी ठेवणे सोपे नाही. पैशाविषयी प्रचंड प्रेम वाटणारे खूप लोक आहेत, कारण या पैशाची मिठी जेव्हढी गोड आहे, तेव्हढीच कडकही आहे, त्या मिठीतून सहीसलामत निघणे फार सोपे नाही! पण आपण जर शिस्त आणि संयमाने ठरवले, तरच त्यातून आपण स्वतःची सुटका करून घेऊ शकतो.

प्रश्नः- भाऊ, एखादा मोठा उद्योग सुरु करण्यासाठी ग्रुप असणे जरुरीचे आहे का?

भाऊः- आयुष्य जसे वाढत जाणारी बाब आहे तसा उद्योग हाही विकासाच्या दिशेने वाढत जात असतो. कायद्याच्या चौकटीत बसून एकाऐवजी दोन, दोनाच्या ऐवजी तीन अशा कंपन्या किंवा फर्म स्थापन करता आल्या तर त्याला आपण ‘ग्रुप’ म्हणतो. आणखी

या पलीकडे या ‘ग्रुप’ संबोधण्याला वेगळा अर्थ आहे असेही नाही. टाटांची ‘टी.सी.एस नावाची कंपनी आहे ती कंपनी आजसुद्धा ‘इन्फोसीस’ पेक्षा मोठी आहे, ‘विप्रो’ पेक्षाही मोठी आहे, टी.सी.एस अर्थातच एक खाजगी कंपनी आहे, ‘टाटा ग्रुप ऑफ कंपनीज’मध्ये टी.सी.एस.चा समावेश त्यांनी केलेला नाही. टी.सी.एस.च्या माध्यमातून जो नफा प्राप्त होतो, तो नफा ‘चॅरिटीज’ मध्ये जमा होतो. आपल्याला हे ऐकून आश्चर्य वाटेल की, टाटा ही कंपनी त्यांच्या एकूण निव्वळ नफ्यापैकी ६० टक्के रक्कम केवळ चॅरिटीसाठी खर्च करते. फार मोठ्या हिंमतीने जैन इरिगेशन चॅरिटीसाठी पाच टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. शेअर होल्डर हे प्रमाण वाढवू देत नाहीत. ‘आम्ही पैसे गुंतवले आहेत, आपण आम्हाला आमचे पैसे द्या, समाजसेवेच्या भानगडीत कशाला पडता?’ असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

प्रश्नः- भाऊ, उद्योग व्यवसाय क्षेत्रातही परिस्थिती आता फार समाधानकारक आहे, असे नाही. अनेक व्यवसाय अस्थिर होताहेत, घरे अस्थिर होताहेत. गेल्या दशकापूर्वी आम्ही व्यवसायात पडलो, तेव्हा एवढी तणावग्रस्त आणि गुंतागुंतीची, टोकाच्या जीवघेण्या स्पर्धेची परिस्थिती नव्हती. भोवतालची ही परिस्थिती पाहत जगणे सुसह्य होण्यासाठी नेमके काय करणे आवश्यक आहे ज्यामुळे स्थैर्य प्राप्त होईल. अशा अस्थिर, तणावग्रस्त परिस्थितीला आपली स्वतःची विचारसरणीच कारणीभूत आहे, की आणखी इतर काही गोष्टींचा हा परिणाम आहे?

भाऊः- विद्यमान परिस्थितीवरचा फार समर्पक प्रश्न आपण विचारला. ह्या प्रश्नाचा रोख भोवतालची परिस्थिती आणि आपण स्वतः या संबंधीच्या समायोजनाविषयीचा आहे. ‘समायोजन’ साधणे, जुळवून घेणे, मार्ग काढणे या प्रक्रिया सर्वांनाच साध्य होतात असे नाही. आपण हे ही म्हणालात की, याला आपण स्वतः जबाबदार आहोत का? या प्रश्नाचे उत्तर, एक कटू सत्य म्हणा हवे तर, होकारार्थी द्यावे लागेल. कारण स्वतःच्या परवानगीशिवाय आपल्या मनात ही स्थिर अस्थिरता बाहेरुन दुसरा कुणीही आणू शकत नाही. चारित्र्य संपन्नतेवर आपल्या आयुष्याची इमारत उभी असेल, तर ती कुणीही बिघडवू शकत नाही. आपल्या विषयी बऱ्या-वाईट चर्चा होणे, ही तर जनरित आहे. अशा चर्चेतून बाह्य नाव लौकिकाला धक्केही बसतात. उदाहरणार्थ वर्तमानपत्रातल्या मंडळींनी समजा आपल्याविषय काही उलटसुलट लिहिले तर समज गैरसमज निश्चितच वाढतात समाजातील अनेक घटकांनी याबाबत खरेतर जबाबदारीने प्रतिक्रिया देणे गरजेचे आहे. वृत्तपत्र आणि इतर प्रसारमाध्यमांची या बाबत तर खूपच दक्ष राहणे गरजेचे आहे वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यमे कोणत्याही आमीषाला बळी न पडता काम करत असतील तर चुकीचे पाऊल त्यांच्याकडून पडणार

नाही.

माझा एक नातू चार वर्षाचा आहे तो विवेकानंद प्रतिष्ठानच्या शाळेत आहे. त्याच्या संदर्भातील एक छोटीशी गोष्ट सांगतो. मी गॅलरीत बसलो होतो. माझा हा नातू माझ्याकडे पळत पळत आला आणि मला म्हणाला, 'दादाजी' मला आरोही 'शटअप म्हणाली' मी त्याला लगेच म्हणालो, 'तू तिला 'धन्यवाद' म्हणून ये जा!' तो तिच्या जवळ गेला आणि तिला 'धन्यवाद' म्हणाला. तेव्हा ती हसायला लागली. दोनतीन दिवसांनंतर माझ्या दुसऱ्या एका नातीने त्याला असेच काही म्हटले. यावेळी मात्र त्याने मला सांगितले की मी तिलाही धन्यवाद म्हणालो. मला हसू आले. मी त्याला घेऊन बसलो त्याला समजावून सांगितले 'तू धन्यवाद म्हणालाना, यालाच 'गांधीगिरी' म्हणतात. जर कोणी उलटसुलट बोलत असेल, तर त्याला आपण चांगल्या शब्दातच उत्तर दिले पाहिजे. मित्रांनो, मला खरोखरच असे वाटते की, आपल्या दैनंदिन जगण्यातही या गांधीगिरीला फार महत्त्व आहे. वेडेवाकडे शब्द उच्चारणे, नकारात्मक वर्तणूक करणे आणि या सर्वांतून तणावग्रस्त परिस्थिती ओढवून घेणे-अशा सवयी, अत्यंत वाईट सवयी आहेत. कसाही प्रसंग असो, कितीही त्रासदायक घटना असो माणसाने शांत मनस्थिती ठेवावी. संयम बाळगावा. सकारात्मक विचार करावा. मुखातून चांगलेच शब्द उच्चारावेत, अशा वेळी चांगले शब्द आठवत नसतील तर गंभीर मौन पाळावे.

माझ्यावर मध्यंतरी खूपच वाईट, बिकट आर्थिक परिस्थिती उद्‌भवली होती. दीड-दीड लाखाचे धनादेश परत येत होते. लॉकर वगैरे सर्व पाहून झाले पस्तीस लाखाचे दागिने निघाले. आर्थिक समस्या फारच भयानक रूप घेऊन समोर उभ्या होत्या. मी डगमगलो नाही, पण काळजीत होतो. एक अत्यंत खाजगी, पण तितकीच पारदर्शक घटना आपल्याला सांगतो. जळगाव जनता बँकेच्या माध्यमातून दादांनी, डॉ. अविनाशजी आचार्यांनी सहकार्याचा हात पुढे केला. दादांमुळे एक कोटी रुपये उपलब्ध झाले. मित्रांनो, माझ्या आयुष्यातल्या या घटना मी कधीही विसरु शकत नाही. बिकट परिस्थिती असताना चिंताग्रस्त मात्र कधी झालो नाही. अशा कठीण काळातही मी लोकांमध्ये मोकळेपणाने वावरलो, निर्भयपणे लोकांशी संवाद साधायचो. माझ्या मनात, माझ्या ध्येयाचा मार्ग सुस्पष्ट होता. मला नेमके काय करायचे आहे? हे मला माहीत होते. अगदी शेवटचा क्षणही समोर येऊन ठेपला तरी त्यापूर्वी मला सर्वांचे पैसे परत करायचे होते, ऋणमुक्त व्हायचे होते. माझ्या सकारात्मक विचारांमुळे मी चिंतेत डुंबलो नाही. **प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांनी तणावग्रस्त राहण्याची गरजच नसते. कितीही प्रतिकूलता निर्माण झाली तरी 'पीस ऑफ माईन्ड' बदलण्याचे**

**काही कारणच नाही. अगदी सामान्य गोष्टींमुळे आपण आपले मूळ भक्कम असणारे विचार बिघडवून घेणार असाल, तर तो मात्र आपला उतावीळपणा आहे! आयुष्याचे चक्र गतिमान राहणारच. आपल्या आधीही हे जग गतिमान होते, आणि आपण गेल्यानंतरही हे जग तसेच राहणार आहे! हे सर्व माहीत असूनही, संपूर्ण जगाचा भार माझ्याच डोक्यावर आहे, अशा भ्रमात रममाण होवून आंबट तोंड आणि लांबट चेहरा करून जगण्यात सार्थकत्व तरी काय?**

विशाल अंतराळात पृथ्वी हा एक ग्रह आहे, तो कित्तीतरी लहान आहे. विस्तीर्ण नभोमंडळात त्याचे अस्तित्व तरी किती असणार? या पृथ्वीवर अडीचशे-तीनशेच्या वर देश आहेत, त्यापैकी आशिया खंडातला एक आपला भारत देश. भारतात ही प्रांत खूप, त्यात आपण एका जिल्ह्यातले, त्या जिल्ह्यातल्या एखाद्या गावातले, गावातल्या एका गल्लीतले, गल्लीतल्या एका घरातले! असे जर आहे, तर या संपूर्ण जगाचा डोक्यावर ताण कशाला करुन घेता? आपण **स्वत:ची सद्सद्विवेकबुद्धी कायम जागरुक ठेवून वागायचे बोलायचे ठरवले  तर अनावश्यक बाबी लक्षात ठेवण्याची आपल्याला अजिबात गरज राहणार नाही.** खोटे बोलण्याची सवय नसणाऱ्याला आपण केव्हा, कुठे काय बोललो कित्ती खोटे बोललो, हे मुद्दाम आठवण्याची आवश्यकताच वाटत नाही. टेंशन नसावे असे वाटत असेल तर सद्सद्विवेकबुद्धीला स्मरुन कार्य करीत रहावे. आपले चरित्र्य आपल्याच हातात आहे. कुणाशी काहीही वाकडेपणाने न वागणे-बोलणे हे ही आपल्याच हातात आहे. भांडण-वाद होणारच नाही. माझ्या नातवाला मी हेच तर समजावून सांगितले! कोणी वाईट शब्द वापरला, भांडण करायला आले तर नम्रपणे 'धन्यवाद' म्हणावे! आणि जोरात आलेल्यांना शांतपणे रवाना करा. आपल्याला हे 'धन्यवाद' म्हणणे कठीण वाटत असेल ही, पण खरोखरच तसे ते अजिबात कठीण वगैरे नाही.

महात्मा गांधीजींचे विचार नेहमीच पथदर्शक आहेत. त्यांच्या विचारांचा आशयच हा आहे की, पापी माणसाचा तिरस्कार करू नका, पापाचा करा. पापी माणसाच्या अंतकरणात शिरुन त्याला सुधरवायचे असेल, तर त्याच्याशी मैत्रभावातून वागा-बोला. मिळते जुळते घ्या, तरच तो बदलू शकेल. आपण त्याच्याप्रमाणेच वाईट वागलात, अपशब्द उच्चारला, शिव्या घातल्या तर तो बदलणार तरी कसा? आपला अनेकदा एक लाडका, अत्यंत प्रिय असा समज असतो की, 'मी जे सांगतो, तेच खरे आहे' मित्रांनो, कोणत्याही भांडणाचे-वाद-विवादाचे मूळ कारण हेच आहे. अनेकदा आपण हे गृहितच धरतो की, 'समोरच्या व्यक्तीला काहीही समजत नाही.' आपण अवलंबतो हे मार्ग खरोखरच चुकीचे आहेत.

एकमेकातील स्नेह संपवून अंतर वाढवणारे आहेत, दुरावा निर्माण करणारे आहेत. साने गुरुजींचे एक वचन नेहमी लक्षात ठेऊ या-खरे ते माझे म्हणा, माझे तेच खरे! असे कृपया म्हणू नका' may be he is right and let me find out despite the fight, I know my position is clear ज्याची चूक होते, त्याला त्याची चूक आज नाही तर भविष्यात केव्हातरी कळेलच, पण आज मात्र आपण मन मोठे करुन म्हणायलाच हवे. मित्रा, ठीक आहे. तू म्हणतो तसे असेलही. तुझे म्हणणे खरे असेल मी निश्चित यावर विचार करेल. माझ्या हातून काही चूक झाली असेल तर मला माफ कर, असे विनम्रपणे सांगण्यासाठी हृदयाची श्रीमंती हवी. मित्रांनो, काही समस्या अनेक लोक स्वतःहूनच ओढवून घेत असतात. बँक म्हटली की, कर्ज प्रकरणे आलीच. कर्ज प्रकरणे आलीत म्हणजे हप्ते वसुली ही करावी लागणारच.

बँकेचे कर्ज घेतलेल्या कर्जदाराने नियमित हप्ते भरले नाहीत, घरात भरमसाठ खर्च केला, रोज हॉटेलात जेवायला गेला, सिनेमा टिव्हीत गुंतून पडून. पैशाची वारेमाप उधळपट्टी करेल तर, जीवनाचे रहाटगाडगे व्यवस्थित राहील का? 'बँकेचा हप्ता आहे, देऊ नंतर,' असे घातक निर्णय त्याला परवडतील का? हप्ते तुंबत जातील, व्याजावर व्याज वाढेल. वसुली अधिकारी घरी येणारच! वारंवार अशावेळी फोन करुन हप्त्याची आठवण देणारच! बँकेच्या जाचक अटी दिवसेंदिवस वाढणारच! टेंशन असे वाढत जाते. जे त्या त्या व्यक्तीने आपल्या चुकीच्या वागण्यातून स्वतःहून ओढवून घेतले आहे. I would suggest that we don't get it in that vicious circle We stop it. This is the way to do it.

प्रश्न - भाऊ, जागतिकीकरणाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या खुल्या बाजारपेठेचा भारताच्या औद्योगिकीकरणा वर तसेच एकूणच आर्थिक परिस्थितीवर नेमका काय परिणाम होईल?

भाऊ - आर्थिकदृष्टया विचार केला तर प्रगतीचा आलेख उंचावत जाईल, हे खरे आहे. गंभीर प्रश्न आहेत सामाजिक शांततेबाबतचे! बऱ्यापैकी पैसा एकाच वर्गाच्या हातात गेला, तर परिस्थिती तणावग्रस्त होणारच. आर्थिकदृष्टया विचार करता, सकारात्मक बाजू अंगीकारुन पाहिले तर प्रगती निश्चित होईल. गेल्या हजार वर्षापासून सुरु झालेल्या भारतीय अस्मितेला आता विलक्षण तीव्रतेने जाग आली आहे. मित्रांनो, ज्यावेळी आपला देश असा खडबडून जागा होतो, तेव्हाच तो सर्वापेक्षा वरचढ ठरतो!

औद्योगिक क्षेत्रात आणि आर्थिक स्तरावर देश नक्कीच आगेकूच करेल. देशातल्या

सामाजिक स्वास्थ्याचे काय? ह्याबाबत काय होईल, याचा आजच अंदाज बांधता येणार नाही. प्रचंड लोकसंख्या असलेल्या या देशात साहजिकच खाणारी तोंडे खूप आहेत. पाश्चात्यांकडे आता परिस्थिती वेगळ्या स्वरूपाची आहे. अतिरिक्त पैशाचे काय करायचे? हा त्यांच्यापुढील मोठा प्रश्न आहे. त्यामुळेच ते आपल्या देशात व आर्थिक गुंतवणूक करायला उत्सुक आहेत. चायनाला त्यांनी या संदर्भात पडताळून पाहिले, पण चायनाला पैसा सांभाळता येत नाही, हे त्यांच्या लक्षात आले आहे. चायनाने तसा इंगाही त्यांना दाखवला आहे. आपल्या भारततात असे इंगा दाखवणारे राज्यकर्ते झाले नाही, आपण आपल्या व्यवसायासाठी आर्थिक संपन्नतेसाठी वाट कोणती निवडतो, हे जास्त महत्त्वाचे आहे.

प्रश्न -भाऊ, आपल्या जैन इरिगेशन कंपनीची सर्वदृष्टया भरभराट झाली. आपल्या संस्थेची अनेक वैशिष्ट्ये जनमानसात रुजली. आपल्या कार्यसंस्कृतीचे वेगळेपण नेमके कशात आहे? आपण कर्मचारी असे निवडतात का, जे चौफेर प्रगतीसाठी खूपच पोषक ठरतात?

भाऊ - मित्रांनो, मी कार्यसंस्कृतीसाठी केवळ माणसे निवडत नाही. तर जाणीवपूर्वक सहकारी घडवतो! कार्य संस्कृतीला पोषक ठरणारे, श्रमसंस्कृतीचे पुजारी, माझे सहकारी माझ्या जीवाचे, प्राणाचे भाग आहेत. ज्या ज्या वेळी संधी मिळेल, त्या त्या वेळी मी प्रत्येक सहकाऱ्याला त्याच्या अगदी खाजगी जगण्यापासून ते व्यावसायिक जीवनापर्यंत अनेक महत्त्वाच्या गोष्टी शांतपणे समजावून सांगत असतो. माझे हे सकारात्मक प्रयत्न आहेत. कधी-कधी समूहाद्वारे हे प्रबोधन घडते. काही वेळा पत्रसंवादही साधतो. मी ज्यांच्याशी माझे हृदयगत साधत असतो, त्या सहकाऱ्यांचे माझ्या वागण्या-बोलण्याकडे सूक्ष्म लक्ष आहे, याची जाणीव मी निरंतर जोपासली आहे.

भाऊ बोलतात, तसे वागतात हे लक्षात आणून दिले तरच तो कृतिशील परिपाठ ठरतो. **आपले काम कितीही कसोटी लागली तरी सचोटीनेच करायला हवे, मन लावूनच, आत्मा ओतूनच करायला हवे** हे वारंवार सांगावे लागत नाही. ज्याचे त्याला कळते बरोबर. म्हणूनच मघाशी मी म्हणालो, माणसे निवडण्यापेक्षा, घडवणे महत्त्वाचे! भरभक्कम पगार दिल्याने ही कार्यसंस्कृती विकसित झाली असा समज असेल तर तो गैरसमज आहे. पाच वर्षात एकदाही पगारवाढ झाली नाही. इतकेच नाही घरातही सुनांना जे पैसे देत होतो, त्यातही गेल्या चार-पाच वर्षात वाढ केलेली नव्हती. पाच वर्षात गाडीही बदलली नाही विद्यमान आर्थिक स्थिती मात्र वेगळी आहे. भरीव पगार यावर्षी दिले. कंपनीच्या एकूण आर्थिक भरभराटीचा विचार करुन आणि सहकाऱ्यांचे योगदान लक्षात घेऊन भरीव पगारवाढ

केली.

मित्रांनो, **प्रत्येक माणसात ईश्वरीतत्त्व दडलेले आहे, ते तत्त्व आणि स्वत्त्व शोधून काढणे, हे खरे कौशल्य आहे. आपण अशा तत्त्वाचा, स्वत्वाचा शोध घेण्याची दृष्टी बाळगली पाहिजे.** भारताची लोकसंख्या एक अब्जच्या वर आहे. त्यातील १० कोटी लोक नोकऱ्या मागत फिरत आहेत. त्यातून आपल्या कार्यप्रणालीला अपेक्षित असे निवडक सहकारी निश्चितच प्राप्त होतात. विलक्षण बुद्धिमत्ता असणारी कार्यकुशल व्यक्तिसंपदा भारतात निश्चितच आहे! आपल्या कंपनीची प्रतिमाही प्रकाशित हवी.

चांगली माणसे स्वतःहून आपल्या कंपनीत आली पाहिजेत. “ही कंपनी अतिशय चांगली आहे, इथे आपण काम करायला हवे,” असे अनेकांना वाटावे, यासाठी आपली प्रतिमा तशी हवी. समाजात आपल्या कंपनीविषयी दृढविश्वास निर्माण करण्याची क्षमता असली तरच, ते शक्य होते. मित्रांनो, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आर. एस. एस.) उदाहरण आदरपूर्वक देतो. संघाची समाजात खरोखरच वेगळी आहे, प्रतिमा सेवाभावी कार्य अतिशय चांगले आहे. औरंगाबादला डॉ. हेडगेवार हॉस्पिटल आहे, अशा आरोग्यविषयक कामाचा नाव लौकिक चांगला आहे. अगदी उत्तर दक्षिणेत, मेघालयात, जाऊन संघ परिवारातील स्वयंसेवक समाजसेवेचे कार्य करतात.

संघाला हे कार्यकर्ते मिळतात तरी कसे? संघ या सेवाव्रतींना भरभक्कम पगार देतो का? या कार्यकर्त्यांना कदाचित मानधनही मिळत नसेल. क्षुधाशांतीची फक्त व्यवस्था होत असेल. तरी हे सेवाव्रती निष्ठेने सामाजिक कार्य करतात. एखाद्या उद्दिष्टपूर्तीसाठी अशा माध्यमातून सहकारी निश्चितच मिळतात. अशा सहकाऱ्यांसमोर उभे राहणारे नेतृत्त्व मात्र तेजस्वी हवे, प्रभावी हवे, जे बोलणार आहे ते करून दाखवणार, या जिद्दीचे हवे!

नेतृत्त्वगुण असणाऱ्याला चारित्र्य खूप जपावे लागते. समर्पणशीलता आवश्यक आहे. सद्सद्विवेक बुद्धीने जीवन व्यवहार साधावा लागतो. तरच इतरांना त्या नेत्याकडून जीवन शिक्षण प्राप्त होते. हे सर्व ज्याला शक्य आहे त्यालाच नावलौकिक प्राप्त होतो. मित्रांनो, माझ्या सहकाऱ्यांसाठी घरकुल उपलब्ध करून देण्याचाही माझा विचार आहे. शक्य झाल्यास विम्याचीही तरतूद करायची आहे. सहकाऱ्यांसाठी जे जे चांगले करता येण्यासारखे आहे, ते ते आपुलकीने करायचे आहे. कंपनीचा प्रमुख जर सहकाऱ्यांच्या हिताचा असा विचार कायम करत असेल तर सहकारीसुद्धा कंपनीशी प्रामाणिकच राहतात. समाजात अजूनही कृतज्ञता आहे. सज्जनशक्ती आहे. या सज्जनशक्तीवर विश्वास ठेवून माणसे जोडणे आवश्यक आहे.

प्रश्न - भाऊ, कोणताही उद्योग व्यवसाय सुरु करायचा असेल किंवा नोकरी मिळवायची असेल तर जिथे शासनाचा संबंध येतो, त्या कार्यालयात सामान्य माणसांना निश्चितच खूप त्रास होतो. असा त्रास कमी होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे?

भाऊ - मित्रांनो, शासकीय कार्यालयातील दप्तर दिरंगाई हा खरोखरच क्लेशकारक विषय आहे. अशा कार्यालयात होणारा त्रास कमी होण्यासाठी आपल्याला आपली एक प्रतिमा संपादन करावी लागेल. भ्रष्टाचार खूपच बोकाळला आहे. समाजाचा सर्वात मोठा शत्रू भ्रष्टाचारच आहे. एवढा मोठा शत्रू गेल्या एक हजार वर्षात आपल्या देशाने पाहिला नाही. मुघलांपेक्षा आणि ब्रिटिशांपेक्षाही अधिक भयानक असे शोषण करणारा हा भ्रष्टाचार रुपी राक्षस खरोखरच त्रासदायक आहे.

जैन इरिगेशनमधील अधिकारी मंडळी कोणत्याही स्वरुपाची लाचलुचपत देत नाही, चुकीचे काम स्वत:ही करत नाहीत, इतरांनाही करु देत नाही - 'नैतिकदृष्टया मूल्य जोपासणारे' अशी प्रतिमा सिध्द झाल्यानंतर फारसा त्रास होत नाही. या निमित्ताने एका घटनेचा विचार आपण करु. एका जिल्हाधिकारी साहेबांनी जैन हिल्सवर आणि अनुभूती शाळेवर रेड टाकली. उपजिल्हाधिकारी तसेच इतरही उच्चपदस्थ अधिकारी औरंगाबादहून या कामासाठी जळगावला आले. कंपनीने या जागांवर किती खड्डे खणलेत, त्यातून किती माती, किती मुरुम काढला? त्यानंतर त्याची रॉयल्टी किती भरली? या प्रश्नांची उत्तरे त्यांना हवी होती. रितसर चौकशी या अधिकाऱ्यांनी केली, त्यांचे पंच तिथे होते, मुरुम, मातीचा हिशेब करुन पंचनामाही केला. साधारणत: ८३,०००/- ब्रास असा तो आकडा समोर आला.

रॉयल्टीची रक्कम जवळजवळ एक कोटी दहा लाख निघाली. त्यावर चारपट पेनल्टी लावून, त्यांनी एकूण पाच कोटी रॉयल्टी भरायला सांगितली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या सर्व मंडळींना सर्व प्रकारचे सहकार्य, या कामकाजावेळी दिले. कंपनीने आपली बाजूही रितसर समजावून सांगितली. "ही जमीन आम्ही १९९६ मध्ये घेतली, त्यावेळी इथे खाण होती, त्यावेळचे छायाचित्रही उपलब्ध आहे. खरेदीखतही तशी नोंद आहे. ती खाण किती क्षेत्रफळाची आहे अशा नोंदीही त्यात आहेत. थोडक्यात कंपनीने ही खाण घेण्याच्या आधी, खाण तिथेच होती, त्यामुळे कंपनीने खाणीतून काही काढले, असा आक्षेप घेता येणार नाही. आपण आम्हाला दोन दिवसांचा वेळ द्या.

आपण खदाणीबाबत रॉयल्टीचा जो हिशोब काढला आहे, त्याबाबत कंपनीने आजपर्यंत किती रक्कम भरली आहे, याची सविस्तर आकडेवारी आम्ही आपल्याला सादर करु" ईश्वरकृपा म्हणा किंवा ज्याला मी सद्सद्विवेकबुध्दी म्हणतो, त्याचा प्रत्यय पहा, त्यांनी

जो आकडा काढला होता, त्यापेक्षा दोन-तीन टक्के जास्तच रॉयल्टी जैन इरिगेशन कंपनीने आधीच भरलेली होती. ज्यावेळी कंपनीने याबाबतचे सर्व दप्तर, रेकॉर्ड त्यांना दाखवले, त्यावेळी ते अधिकारी अक्षरशः चकितच झाले. संपूर्ण जळगाव जिल्ह्यातून जेवढी रॉयल्टी जमा होत नसेल, तेवढी केवळ एकट्या जैन इरिगेशन कंपनीकडून प्राप्त झाली होती. केवळ एक वर्ष नव्हे तर ही रॉयल्टी गेल्या तीन वर्षापासून प्राप्त होत असल्याचे, त्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

मित्रांनो, **जगात जे दुःख आहे, त्याचे कारण परस्परांविषयीचे अकारण पूर्वग्रह आणि गैरसमज हेच आहे.** कुणाच्याही चटकन मनात येऊ शकते की, खदाणी बाबत चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना माझ्याकडून पैसे उकळायचे होते! रेड त्यासाठीच त्यांनी टाकली, असा गैरसमज लगेच होऊ शकतो. माझी प्रतिक्रिया समजावून घ्या. आपण जर चुकीचे काम केलेच नसेल, तर मनःस्ताप का करून घ्यायचा? माझ्या सहकाऱ्यांनाही मी स्पष्ट सूचना वेळोवेळी दिल्याच होत्या, त्यामुळे वेळोवेळी रॉयल्टी भरण्याचे काम कायद्याप्रमाणे चोख झाले होते. कायदा गाढव असला तरी चालतो, आपले भान आपण राखावे! (हशा) जागरूक राहिलो तर भ्रष्टाचार बऱ्याच अंशी टाळता येईल.

जैन इरिगेशन नावाला आंतरराष्ट्रीय वलय लगेच प्राप्त झालेले नाही. त्यासाठी फार मोठा इतिहास रचावा लागला. चांगले मार्ग जोपासावे लागले, प्रतिकूलतेशी अनेकदा टक्कर घ्यावी लागली. कितीही त्रास झाला, तरी मूलभूत मूल्यांबाबत तडजोड केली नाही. विशिष्ट ध्येय्-उद्दिष्टाने जोपासलेल्या कार्यसंस्कृतीने हा किल्ला अभेद्य ठेवला.

आपण सर्वच सुसंस्कृत माणसे आहोत. आपल्या संस्कृतीची आपल्याला चाड आहे. संस्काराचे मोल आपण जाणतो. एक गोष्ट ही सुद्धा लक्षात घ्या, आपण जेवण करत असताना समजा उंबरठ्याजवळ कुत्रा आला तर आपण काय करतो? समजा तो कुत्रा आल्या आल्या भुंकायला लागला, तर लागलीच आपण चतकोर पोळी किंवा भाकर देतो. फुटकळ भ्रष्टाचाऱ्यांकडे त्या प्रमाणेच पहा! चतकोर पोळी, भाकरीचा तुकडा त्यांच्यापुढे टाकून मोकळे व्हा, त्या पलीकडे त्यांची या जगात किंमत तरी काय? समजा मला शाळा काढायची आहे. संबंधित लिपीक पन्नास रुपये घेतल्याशिवाय फाईलच पुढे सरकवायला तयार नसेल तर काय करावे? बिचाऱ्याचे त्याच्या पगारात भागत नसेल, त्याची कौटुंबीक गरज जास्त असेल, असा मोठ्या मनाने विचार करून तुकडा टाकून दिला तरी चालेल.(हंशा) आपण लगेच म्हणाल. हा तर तत्त्वाचा प्रश्न आहे.

आपण तत्त्वाच्या दृष्टिकोनातूनही विचार करू. २/३ महिने आपल्या कामाला होणारा उशीर आपल्याला मान्य असेल तर मित्रांनो, त्यासाठी असल्या लहान-सहान तडजोडी करण्याचीही गरज नाही. पहिल्या मार्गापेक्षा, वाट पहाण्याचा दुसरा मार्ग अधिक योग्य आणि उत्तम आहे. **तत्त्वे पाळायची तर किंमत मोजावीच लागेल.** भ्रष्टाचार रोखायचा असेल तर मनाची खूप मोठी पूर्व तयारी करून घ्यावी लागेल.

मित्रांनो, भविष्याची वाटचाल करताना भ्रष्टाचाररुपी राक्षसाचा एकजुटीने सामना करण्यासाठी सिद्ध होऊ या. सुसंस्कृत, **आदर्श नागरिकांचा संघ म्हणजे सज्जनशक्ती.** सज्जनशक्ती एकसंध ठेवण्याचा दृढ संकल्प या कार्यक्रमानिमित्ताने करु या. या उद्योग विशेषांकाच्या प्रकाशनानिमित्त आपणा सर्वांसोबत सुसंवाद साधण्याची संधी प्राप्त झाली, त्याबद्दल "तरुण भारत" परिवाराचे मी आभार मानतो. धन्यवाद!